# समकालीन साहित्याचे सांस्कृतीक संदर्भ.

**प्रा.डॉ.प्रल्हाद वावरे**, फुलसिंग नाईक महाविद्यालय., पुसद मो.नं. **9421771733**
Email:drpjwawre@gmail.com

साहित्य हे समाज जीवनाचं प्रतिबिंब असतं असं सामान्यत: म्हटल्या जातं. साहित्यामधे समाज जीवनाचं प्रतिबिंब पडतं म्हणजे नेंमक काय घडतं? त्या विशिष्ट समाजाचं, समाज घटकांचं त्याच्या प्रथा, परंपरा, विचार—आचार यांच्या सवई, रूढी आदी विविध पैलुंचं दर्शन साहित्या मधून घडतं. म्हणजेच साहित्यामधून मानवी संस्कृतीचं दर्शन घडतं. जशी त्या स्थळकाळातील मानवी संस्कृती असेल तसंच तिचं प्रतिबिंब साहित्यामध्ये प्रतिरूप म्हणून शब्दांकित झालेलं असेल. किंबहुना संस्कृती नुसारचं साहित्यामधील विविध शाखांचा विकास विस्तार झालेला दिसुन येतो. साहित्यातील मुख्य प्रवाह आणि प्रवृत्ती प्रथमत: एका समुहाच्या संस्कृतीशी निगडीत असतात. संस्कृती आणि साहित्य यांची काहिशी समरूपी (Homologicl) वाटचाल होते. संस्कृतीत आवर्त सुरू होतात तसे ते साहित्यात प्रतिध्वनित होतात आणि मग परिवर्तनाची प्रेरणा निर्माण होते. कोणत्याही भाषेतील साहित्य तेथील संस्कृतीचे संदर्भ विपुल प्रमाणात दिसून येतात.

मराठीतील समकालीन साहित्यातील दिसून येणाऱ्या विविध प्रवृत्ती व प्रेरणा यांच्या मुळाशी सांस्कृतिक संदर्भ दडलेले असून समकालीन साहित्याचे अध्ययन व परिशीलन करतांना हया सांस्कृतीक संदर्भाचे नेमके आकलन घडू शकते. समकालीन साहित्यातील सांस्कृतिक संदर्भ शोधण्यापुर्वी मराठी साहित्यामधे समकालीन साहित्य कोणते याचा शोध आधी घ्यावा लागेल.

१)केशव शिरवाडकर : समकालीन साहित्य प्रवृत्ती आणि प्रवाह. पृ.क्र. ३१

समकालीन साहित्याची व्याख्या कशी करायची, त्याची काल कक्षा कोणती ठरवायची? समकालीन साहित्यासाठी काळाचा निकष वापरायचा की आणखी कोणता? या प्रश्नांची विविध उत्तर मिळतात.

समकालीन साहित्य म्हणजे स्वातंत्र्योत्तर कालीन साहित्य असे सांगण्यात येते. काळाच्या दृष्टीने विचार केल्यास भारताच्या इतिहासातील स्वतंत्र्यप्राप्ती ही अत्यंत महत्वाची घटना आहे. शेकडो वर्षाची गुलामगिरी व पारतंत्र्य झुगारून देऊन सर्व देश इतिहासात प्रथमच राजकीयदृष्टया स्वतंत्र, सार्वभौम होतो आहे. आधुनिक जगात एक उदयोन्मुख राष्ट्र म्हणून प्रगतिसाठी सज्ज होतो आहे ही गोष्ट निश्चितच महत्वाची आहे. कोटयावधी भारतीयांना आनंदित करणारा हा क्षण आहे. हजारोंच्या बलिदानाने या स्वप्नाची परिपुर्ती झाली असल्याने देशाच्या राजकीयच नव्हे तर वाङ्मयीन जीवनातही त्याचे महत्व आहे. म्हणून स्वातंत्र्यपूर्व असे दोन भाग साहित्याचे मानावेत असे एक मत मांडण्यात येते व काही प्रमाणात ते पटण्यासारखेही आहे.

देशाला स्वातंत्र्य मिळाल्याच्या या घटनेचा परिणाम प्रत्यक्ष साहित्याच्या स्वरूपावरही झाला आहे. लोकशाही, एक व्यक्ती एक मत, सार्वत्रिक शिक्षण, पंचवार्षिक योजना, पंडित नेहरूंचा स्वप्नाळू का होईना पण समाजवाद हा आदर्श, धर्मनिरपेक्ष राष्ट्राची घोषणा, या सर्व गोष्टींमुळे साहित्यावर दूरगामी परिणाम झाले. तळातील जाती, अन्यायपिडीत व उपेक्षित समाज जागृत झाले. निद्रीस्त ग्रामिण भागाला जाग आली. प्रादेशिक भाषांना महत्व प्राप्त झाले. या सर्व गोष्टींचे परिणाम साहित्यात दिसू लागले. स्वातंत्र्याकडून अपेक्षा करणारे व सुखाची स्वप्ने पाहणारे एक राष्ट्रवादी मन साहित्यात व्यक्त होऊ लागले. बाबुराव बागुलांच्या कथेतील नायक असा दिसतो. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज व कर्मयोगी संत गाडगेबाबा यांसारख्या आधुनिक काळातील कर्त्या संतांनी समाजातील तळ आपल्या लोकोत्तर भजन किर्तनाने ढवळून काढला. त्यामुळे तळागाळातील, गिरीकंदरातील, सांदी कोपऱ्यातील उपेक्षित समाज जागा झाला. आपल्या आशा आकांक्षा व इच्छांना भजन किर्तनातून व कवनांच्याव्दारा तो अभिव्यक्त करू लागला.

तात्पर्य काळाच्या दृष्टीने एक महत्वपूर्ण राष्ट्रीय घटना म्हणून वाङ्मयाच्या दृष्टीने दूरगामी परिणाम करणारी घटना म्हणून भारतीय स्वात्र्याचा कालबिंदु समकालीन साहित्याचा प्रारंभबिंदु मानायला हवा असे एक मत आहे.

दुसरे मत असे आहे की, दुसरे महायुध्द ही एक जागतिक महत्वाची घटना असून तिने जगाच्या अनेक क्षेत्रात उलथा पालथ केली. या महायुध्दाने जगाचा राजकीय नकाशाच बदलला. ब्रिटीश साम्राज्यशाहीचा ऱ्हास, अमेरिकन साम्राज्यशाहीचा उदय, जर्मनीचे विभाजन, समाजवादी राष्ट्राची निर्मिती, वसाहतींच्या देशातील राष्ट्रीयमुक्ती लढे व स्वातंत्र्यप्राप्ती, साम्यवादी चीनचा उदय हे मानवी जगाचे आमुलाग्र बदललेले राजकीय चित्र. तर सामाजिक जीवनात युरोपचा झालेला विध्वंस, पाच कोटी लोकांची प्राणहानी, बेघर, बेकार, अनौरस, अपंग, मनोरूग्ण अशा असंख्यांची झालेली वाढ हे सर्व पाहून व भोगून निराश, अगतिक झालेला, दुभंगून गेलेला माणूस मानवी जीवनावरील विश्वास व श्रध्दा गमावून पराभूत झालेला माणूस हे सामाजिक क्षेत्रतील दारूण चित्र होते. जाणीवेच्या क्षेत्रातही पडझड झाली.

नैतिक मूल्यांचा ऱ्हास झाला. आतापर्यंत उराशी कवटाळून ठेवलेली उदात्त मूल्ये हया वणव्यात होरपळून गेलीत. मानवी जीवनाला काही अर्थ नसून ते निरर्थक, क्षुद्र व क्षणभंगूर आहे याची विदारक जाणीव झाली. युरोपात जरी मुख्यत: युध्द लढले गेले तरी जगच इतके लहान झाले होते की युध्दलाटांच्या थपडा भारतीयांच्याही मनावर येऊन आदळल्यास नवल नाही.

मार्क्स, आइन्स्टाईन, फ्रॉईड, रसेल व सार्च यांचे विविधक्षेत्रातील विचार व संशोधन यांनी मानवी जीवनाकडे पाहण्याच्या दृष्टीला नवीन परिमाणे प्राप्त झाली. या सर्व उलथापालथीचे प्रतिबिंब जागतिक वाड्मयात पडले तसे मराठी वाड्मयातही पडले. मनोविश्लेषण, नेणीवप्रधानता, प्रतिमाप्राधान्य, दुर्बोधता, आश्लिलता, भग्नमनस्कता, परात्मता या विविध प्रवृत्ती महायुध्दोत्तर साहित्यात दिसू लागल्या. युध्दपूर्व साहित्यापेक्षा अगदी वेगळे हे साहित्य दिसू लागल्याने त्याला नवसाहित्य ही व्यापक (खरे म्हणजे ढोबळ) संज्ञा प्राप्त झाली. मर्ढेकर, गंगाधर गाडगिळ, अरविंद गोखले, व्यंकटेश माडगुळकर, विजय तेंडूलकर, दिलीप चित्रे, जी.ए. कुलकर्णी, भावे, चि. त्र्यं. खानोलकर, विंदा करंदीकर, शरदचंद्र मुक्तीबोध, म.द.भावे ही नवसाहित्य लिहिणारी लेखकांची पिढी उदयाला आली.

तात्पर्य दुसरेमहायुध्दोत्तर साहित्य म्हणजे समकालीन साहित्य अशी व्याख्या करावी. कारण जागतिक महत्वाची घटना व नव्या वाड्मयीन प्रवृत्तींना जन्म देणारी घटना म्हणून दुसऱ्या महायुध्दानंतरचे साहित्य ते नवसाहित्य, समकालीन साहित्य मानावे असे एक मत आहे.

समकालीन साहित्याची व्याख्या बाहय घटकांनी करण्यापेक्षा मराठी साहित्यातील एखाद्या कर्तृत्ववान साहित्यिकाच्या लेखनावरून करावी असे एक मत आहे. यांचे म्हणणे असे की अर्वाचीन मराठी साहित्याने जे नवीन वळण घेतले त्याला आपण नवसाहित्य म्हणतो. या नवसाहित्याची वैशिष्टये प्रामुख्याने ज्या लेखकात दिसतात आणि नंतरच्या साहित्यिकांवर ज्याचा ठसा उमटलेला दिसतो आहे असा नवसाहित्याचा प्रतिनिधिक लेखक म्हणजे बा.सि. मर्ढेकर. मर्ढेकरांनी मराठी कवितेत नवा आशय आणला. नवी अभिव्यक्ती आणली. महायुध्दोत्तर साहित्याच्या विविध प्रवृत्ती उदा. दुर्बोधता, प्रयोगशिलता, नेणीवप्रधानता, प्रतिमाप्रधानता, भ्रमनिरास, परात्मता, निराशा यांच्या साहित्यात दिसतात. अविष्काराच्या बाबतीत सज्ञाप्रवाह, यंत्रयुगीन प्रतिमा, नवी भाष्यशैली यांच्या साहित्यात दिसते. समर्थ कवी, समीक्षक, कादंबरीकार म्हणून त्यांचे अनुकरण पुढील अनेकांनी केले. म्हणून मर्ढेकरांनी 'खुणेचा दगड' मानून त्यांच्या नंतर चे साहित्य ते समकालीन साहित्य मानावे असे एक मत आहे.

अलीकडचे साहित्य ते समकालीन साहित्य, आपल्या पिढीचे साहित्य ते समकालीन साहित्य, वर्तमानकालीन साहित्य ते समकालीन साहित्य अशाही काही व्याख्या करण्यात येतात. या व्याख्या संदिग्ध व सदोष असल्याने त्यांचा विचार करण्याचे कारण नाही. कारण कुठलाच निकष येथे स्वीकारलेला नाही.

समकालीन साहित्याची कालकक्षा व व्याख्या ठरवितांना आपल्याला दोन निकष लावावे लागतील दोन दृष्टिकोनातून विचार करावा लागेल :—

१) वाड्मयीन दृष्टया विचार

२) कालदृष्टया विचार.

कालदृष्टया विचार केल्यास समकालीन वास्तवाचे प्रतिबिंब ज्यात पडले आहे, समकालीन वास्तवाचा अविष्कार ज्यात झालेला आहे ते समकालीन साहित्य असे म्हणता येईल. पण समकालीन वास्तव म्हणजे काय आणि ते एकच एकसंघ आहे का? समकालीन वास्तव म्हणजे वाचकाच्या भोवतालचे वर्तमान कालीन आर्थिक, सामाजिक, राजकीय आणि वैचारिक सांस्कृतिक वास्तव हे वास्तव एकसंघ नसते. उदा. आर्थिकदृष्टया पाहिल्यास समाजात श्रीमंत गरीब व मध्यमवर्ग असे थर दिसतात. श्रम करणारे, घाम गाळणारे व चैन करणारे खुशाल चेंडू म्हणजे शोषक — शोषित असे वर्ग दिसतात. सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक विषमता आहे. स्त्री—पुरूष भेद, स्त्री—पुरूष विषमता व स्त्रीचे त्यात दुयम स्थान आहे. जातींची उतरंड आहे. जन्माने ठरणारी वर्ण व्यवस्था आहे. जनावरापेक्षाही हीन अशी वागणूक मिळालेल्या जाती एकीकडे आहेत. तर देवापेक्षाही श्रेष्ठत्व प्राप्त झालेल्या जाती दुसरीकडे आहेत. असे दुभंगलेले समाजजीवन आहे. सांस्कृतिक दृष्टया पुढारलेले समूह व संस्कृतिच्या परिघाबाहेर राहिलेल्या आदिवासी व वन्य जमाती असे दुहेरी वास्तव आहे. इथे माणसे आजही रामायण महाभारताच्या काळात मनाने वावरत आहेत. शिवाजीच्या, पेशवाईच्या व मोगल सल्तनतीच्या युगात वावरत आहेत. विज्ञानाचे सर्व कायदे लादून त्याच्या नावाने बोटे मोडतांना दिसताहेत आणि त्याच वेळी राकेश शर्मा अंतराळात जातो, जयंत नारळीकर, हरगोविंद खुराणा यांना नोबेल पारितोषिके मिळत आहेत.

तात्पर्य भारतातील कुठलेच वास्तव एकसंघ नाही. ते स्पष्टपणे दोन गटात विभागले गेलेले आहे. उदा. शिक्षीत—अशिक्षीत, नागर—ग्रामीण, श्रीमंत—गरीब, स्पृष्य—अस्पृष्य, सवर्ण—दलीत, अल्पसंख्यांक—बहुसंख्यांक, प्रस्थापित—विस्थापित इत्यादी या सर्वांमधे आहे त्या स्थितीचे समर्थन करणारे 'जसे थे' वादी आणि आहे ती

स्थिती–परिस्थिती बदलली पाहिजे' व सर्वाच्या सुखाचा विचार केला पाहिजे असे म्हणाऱ्याचे वैचारिक तर आपल्याला स्पष्टपणे दिसून येतात.

प्रश्न असा पडतों की यापैकी कोणत्या वास्तवाचे चित्रण करणारे साहित्य समकालीन साहित्य मानायचे? कुठल्या गटाचे साहित्य समकालीन साहित्य म्हणून स्वीकारायचे? त्याचा काळ आणि वैशिष्टये कोणी आणि कशी ठरवायची?

उत्तर असे की, काळाचा निकष एका मर्यादेपर्यंतच उपयुक्त आहे. तेवढयापुरता त्याचा उपयोग करून नंतर त्याला दुसऱ्या एखाद्या निकषाची जोड द्यायची. उदा. भूतकालीन जीवनाचे इतिहासातील किंवा पौराणिक काळातील जीवनातील दर्शन घडविणारे साहित्य हे समकालीन साहित्य मानू नये. याचा अर्थ हे साहित्य निकृष्टच असते, टाकाऊ असते असा नव्हे. तो वेगळा मुद्दा आहे. शिवाय गतकाळाचे नवे अर्थन करणारे (न्यु इंटरप्रिटेशन). आधुनिक जाणीवांनी त्याकडे पाहणारे साहित्य हे त्याचा विषय गतकालीन आहे म्हणून ते समकालीन नाही असे होणार नाही. उदा. बाबुराव बागुलांच्या सूड कादंबरीतील जीवन मध्ययुगीन असूनही ती कादंबरी समकालीन ठरेल. कारण नवे अर्थ जी.ए. कुळकर्णी यांच्या कथेतील वातावरण ऐतिहासिक, पौराणिक, सरंजामशाहीवादी असूनही त्यांची कथा समकालीन ठरेल. कारण लेखक त्याकडे अस्तित्ववादी नजरेने पाहतो. पण स्वामी मंत्रावेगळा, झेप, श्रीमान योगी, इथे ओशाळला मृत्यु, मृत्युंजय, तो राजहंस एक हया कलाकृतींचा मात्र समकालीन साहित्यामधे समावेश करता येऊ शकणार नाही. उलट कौंतेय, चक्र या विद्याधर पुंडलीक यांच्या साहित्यकृती कदाचीत समकालीन साहित्यात समाविष्ट करता येतील. त्यांच्या लिखाणातील आधुनिक जाणीवांमुळेच ते शक्य होईल. याऊलट अत्याधुनिक किंवा 'लेटेस्ट' पुस्तके समकालीन साहित्य म्हणून ठरतील असेही नव्हे. सुमती क्षेत्रमोडे, बाबा कदम, कुमुदिनी रांगणेकर, चंद्रकांत काथोडकर वगैरे अनेक साहित्यिक दर महिन्यात कादंबरी लिहित होते म्हणून त्यांचे साहित्य चालू काळातील 'लेटेस्ट' साहित्य असूनही त्याचा समावेश समकालीन साहित्यामधे होऊ शकणार नाही.

समकालीन वास्तवाचे दुहेरी चित्रण ज्यात आहे, वास्तव चित्रण ज्यात आह ते काळाचे दृष्टीने समकालीन साहित्य मानावे लागेल. वर्गिय, वर्णिय, जातीय वास्तवाचे चित्रण करणारे वर्तमानकालीन समाजजीवन प्रतिबिंबीत करणारे ते समकालीन साहित्य. ज्याप्रमाणे भूतकालीन जीवनाचे दर्शन घडविणारे साहित्य समकालीन ठरणार नाही. त्याप्रमाणे भार पुढच्या काळाचे दूरच्या भविष्यातील जीवन चित्रीत करणारे साहित्य समकालीन ठरणार नाही. उदा. विप्लव सारख्या कादंबरीत अरूण साधुंनी साम्यवादी समाजातील माणसांचे मन, त्यांचा विशाल, गंभीर, प्रसन्न दृष्टीकोन चित्रित करू पाहतात. पण हे समकालीन वास्तव नव्हे. हे स्वप्न वास्तव आहे. जयंत नारळीकर प्रेषित मध्ये परग्रहावरील माणसाचे पृथ्वीवरील आगमन रेखाठतात हे किंवा असेच चित्रण उद्याचे वास्तव निश्चित आहे. पण ते समकालीन वास्तव नव्हे. ते भविष्यकालीन वास्तव आहे. नारायण धारप, लक्ष्मण लोंढे वगैरे विज्ञानकथा, गूढ कथा, अतीमानसशास्त्रावर आधारित कथा लिहिणारे लेखक समकालीन ठरणार नाहीत. कारण एका व्यक्तीची मानसिकता म्हणजे समाजाची मानसिकता नव्हे. समुहाची एक सामुहिक दृष्टी असते व तिचा एक विशिष्ट पल्ला (रेंज) असतो. एक व्यक्ति फार पुढचे, भविष्यातले पाहू शकेल असा समाज तसे पाहू शकत नाही. समकालीन साहित्याच्या काळाचा निकष ठरवितांना भूतकालीन व भविष्यकालीन अशा मर्यादा लक्षात घ्याव्या लागातात. काळाच्या पोटात गडप झालेला भूतकाळ व अज्ञात असलेला भविष्यकाळ ही दोन्ही टोके टाळून वर्तमानकालीन जीवनाचे चित्र रेखाटणारे साहित्य हे समकालीन साहित्य होईल. याची कक्षा तीस–चाळीस–पन्नास वर्षाचीही असू शकेल.

स्वातंत्र्य हा कालबिंदू, दुसरे महायुध्द हा कालबिंदू व नवसाहित्य – मर्ढेकर हा कालबिंदू घेतले तरी अनुक्रमे १९३५ – १९४५ व १९४० ते १९५० असे हे कालबिंदू येतात. यांची सरासरी काढल्यास साधारणतः १९४० पासून ते १९५० पासूनच्या साहित्याला समकालीन साहित्य समजावे. मग कोणी त्याला स्वातंत्र्योत्तर म्हणेल किंवा महायुध्दोत्तर म्हणेल पण मर्ढेकरपूर्व आणि मर्ढेकरोत्तर असे म्हणता येणार नाही. कारण मर्ढेकरी प्रवाह हा समकालीन साहित्यातील एकमेव प्रवाह नव्हे.

समकालीन तत्वाचा निकष ठरविण्यासाठी काळतत्वापेक्षा दुसरे फार महत्वाचे तत्व आहे. ते म्हणजे मूल्यांचे किंवा जाणीवांचे हे तत्व वाङ्मयीन आहे. म्हणजे प्रत्यक्ष कलाकृतीमध्ये त्याचे दर्शन घडते. म्हणून साहित्यदृष्टया विचार करतांना आशय, अभिव्यक्ती आणि मूल्य किंवा जाणीवा यांचा विचार समकालीनतेच्या संदर्भात फार महत्वाचा आहे. काळाच्या दृष्टीने साहित्याचा विचार करण्यापेक्षा गुणांच्या दृष्टीने साहित्याचे रूप, प्रकृती, आशयाभिव्यक्ती व मूल्य या दृष्टीने साहित्याचा विचार केल्यास अधिक उपयुक्त होईल.

समकालीन साहित्याच्या आशयाची वैशिष्टये कोणती? या प्रश्नाचे उत्तर सामान्यतः असे देता येईल की –

१) वास्तववाद (रिॲलिझम)

२) समग्रता (टोरॅलिटी)

३) आधुनिकता (मॉडर्निटी)

वरिल तीन गुणविशेष समकालीन साहित्यात अंतर्भुत झालेले आढळतात. मानवी जीवनाकडे स्वप्नरंजनात्मक (रोमॅंटीक) दृष्टीने पाहता येते तसेच वास्तववादी नजरेनेही बघता येऊ शकते. स्वप्नरंजनवादी नरजेने पाहिल्यास जीवनाचे एक सुंदर, स्वप्नील, हळूवार पण आभासमय आणि खोटे, तथलादु दर्शन आपल्याला घडेल. जीवनात अवती–भोवती सर्वकाही आलबेल आहे. आकाशात ईश्वर आणि पृथ्वीवर माणूस सुखात आहे. आयुष्यातील व मानवी जीवनातील सर्व प्रश्न, समस्या संपल्या आहेत असे वाटू लागले. सर्वत्र हिरवळ पसरली आहे. फळे फुलली आहे. चांदणे विखुरले आहे आणि काळे गोरे कुठेच नाहीत. दु:ख, असंतोष, असमाधान कोठेच नाही असे वाटू लागेल. हा प्रत्यय एखाद्या व्यक्तिपुरता प्रामाणिक असेल पण तो वास्तव असणार नाही. बहुसंख्यांकांचा असणार नाही. तसेच जीवनात केवळ यश महत्वाचे मानून आपल्या यशात आत्मसंतुष्ट राहणे व आपल्यावरून जगाची कल्पना करणे स्वप्नरंजनामुळेच शक्य होत असते. पण त्यामुळेच वास्तवाचे नीट आकलन होत नाही. ते अपुर, धुसर, एकांगी किंवा विकृत राहते. स्वप्नरंजनात्मक साहित्य आपल्या क्षूद्र सुखदु:खाचे अवडंबर माजविते. त्या साहित्यात खोली नसते. उथळपणा असतो. उंची नसते. खुजटपणा असतो. वास्तवाचा प्रखर प्रकाशस्त्रोत पडताच त्याचे रंग वितळून जातात. मराठीतील बहुतेक प्रस्थापितांचे व नवशिक्यांचे साहित्य असे स्वप्नरंजनात्मक साहित्य आहे. वास्तवाच्या, वर्तमानाच्या डोळयाला डोळा मिळविण्या ऐवजी हे साहित्य त्याच्याकडे पाठ फिरविते. स्वत:ला संकूचीत कोणात गुरफटून घेते नाहीतर चक्क भूतकाळात पळत सुटते. सर्वात जास्त लोकप्रियता असलेल्या हया प्रवृत्तीत एका बाजुने पलायनवाद तर दुसऱ्या बाजुने मराठी समाजाची राष्ट्रीयता जोराने, मांडण्याची वृत्ती, यांचा संयोग झालेला दिसतो. असे वास्तवापासून दूर पळणारे हे पलायनवादी साहित्य असते. आपल्याला बोचणारे, टोचणारे, सलणारे अस्तित्वातच नाही अशी सोईस्कर समजूत त्याने करून घेतलेली असते. क्वचित प्रसंगी कटू वास्तवाचा घोट गिळण्याची पाही आलीच तर लवकरच आपले काल्पनिक सुख अस्तित्वात येईल असे या स्वप्नरंजनवादी लेखकांना वाटते. ते भविष्याला सामोरे जाण्याऐवजी भूतकाळाकडे वळतात आणि परंपरेच्या कलेवराला कवटाळतात. मराठीत मध्यंतरीच्या काळात उदंड आलेले ऐतिहासिक, पौराणिक कथा कादंबऱ्यांचे पीक हे स्वप्नरंजनवादी साहित्याचे एक उत्तम उदाहरण आहे. बाळ कोल्हटकर, पु.ल. देशपांडे, मधुसूधन कालेलकर, वसंत कानेटकर, यांची नाटके गो.नि. वांडेकर, रणजीत देसाई, इनामदार, शिवाजी सावंत, बाबासाहेब पुरंदरे यांच्या कथा कादंबऱ्या मराठीतील तथाकथीत 'इनोदी' साहित्य होय. घटनाप्रधान, भडक, रंजक ग्रामीण कथा कादंबऱ्या व प्रेम विषयावरील बहुतेक कविता कादंबऱ्या ही आणखी काही उदाहरणे.

निखळ सौंदर्य, निसर्ग, किंवा निसर्ग माध्यमातून प्रिती चित्रण करणाऱ्या बोरकर, संत, मनोहर, पाडगावकर यांची सुध्दा काही एक सामाजिक व कलाविषयक भूमिका असतेच. पण वरील लेखकांप्रमाणे ते परंपरावादी किंवा प्रतिगामी नसतात. मुख्य म्हणजे वरील लेखकांप्रमाणे ते भ्रम जोपासत नसतात.

स्वप्नरंजन म्हणजे वास्तवता नव्हे मग वास्तववादी दृष्टीकोन म्हणजे वास्तवाचे आहे तसे हुबेहुब, यथातत्थ्य, फोटोग्राफीक चित्रण ना? उदा. मराठीत झोपडपट्टी वरील बऱ्याच कथा कादंबऱ्या प्रसिध्द झाल्या आहेत. चक्र, माहिमची खाडी, हातभट्टी यात झोपडपट्टीमधील जीवनाचे यथातत्थ्य वर्णन केलेले आहे. पण हा खराखुरा वास्तववाद नव्हे. कारण इथे वास्तवाचे मूल्यरहीत चित्रण आहे. तसेच आपण काहीतरी धीटपणे लिहीत आहोत असे 'थ्रिल' मनातल्या मनात लेखकाला वाटत असल्याचे जाणवते. एक 'चव बदल' म्हणून किंवा 'हवा बदल' म्हणून हे लोक झोपडपट्टीकडे, झोपडपट्टीतील जीवनाकडे वळल्याचे दिसते. त्यामागची त्यांची सहृदयता, आत्मियता, सामाजिक बांलिकी जाणवत नाही.

तसेच तात्कालिन समस्या, वर्तमानातील चालू प्रश्न व घटना हाताळणारे लेखन समकालीन लेखन नव्हे. म्हणजे असे की, जक्कल–सुतारचा खून खटला गाजतो आहे काय? अविनाश पांडे – शन्मुगम यांच्यातील हाणामारीचे प्रकरण रंगले आहे काय? लिही त्यावर नाटक किंवा कथा. नानावटी केस गाजली काय? मग काढा त्यावर 'अपराध मीच केला' हे गल्लाभरू नाटक थोडक्यात मर्यादित विषयाला, समस्येला, व्यापकतत्वाला जोडल्याशिवाय सार्वकालीकाशी जोडल्याशिवाय समकालिनत्वाचा दर्जा त्या लेखनाला प्राप्त होऊ शकत नाही.

तेच वास्तववादी साहित्य समकालीन समजल्या जाईल जे एकतर वास्तवाची समीक्षा करते. चिकित्सा करते. वास्तवातील विसंगतीवर बोट ठेवते कधी प्रहार करते. वास्तवातील अन्याय, विषमता, कुरूपता यांचा निषेध करते. संदराचे जयगीत गाते. वास्तवाचे वरवरचे चित्रण न करता भेदक दृष्टीने तसेच सडके अंत:करण व त्यातील अंतर्विरोध दर्शविते. अशाप्रकारे टीकात्मक, आत्मालेचक वास्तववादाचे (क्रिटीकल रिॲलिझम) तिक्ष्ण शस्त्र हाती घेऊन वास्तवाचे अंतरंग स्पष्ट करणारे साहित्य समकालीन साहित्य होईल. अरूण साधु, बाबुराव बागुल, सूर्वे, मर्ढेकर, सतीष आळेकर, भालचंद्र नेमाडे, भाऊ पाध्ये, लक्ष्मण माने, दया पवार यांचे साहित्य या प्रकारात मोडते.

वास्तववादाबरोबर समकालीन साहित्याच्या आशयाचे दुसरे वैशिष्टय म्हणजे, समग्रता म्हणजे व्यक्तिचे मन समग्रतेने जाणून घेण्याचा प्रयत्न करणे. तसेच वास्तवाचे साकल्याने आकलन करून घेणे. व्यक्तिला सर्वांगाने जाणून घेतांना स्वाभाविकच नवमानसशास्त्राचा आधार घ्यावा लागतो. युग चा सामुहिक नेणीवेचा सिध्दांत ध्यानी घेऊन मानवी मनाचे तळाशी जाऊन दर्शन घ्यावे लागते. मनोविश्लेषण, संज्ञाप्रवाह, कामगंड व इतर विविध गंड, अंतरमनातील सूक्ष्म भाव, विकार, तरंग यांचे दर्शन घ्यावे लागते. या बाबतीत नवसाहित्यात मर्ढेकरांची संज्ञा प्रवाहत्मक कादंबरी व कविता, गाडगिळांच्या कथा, कानेटकरांची 'पंख' सारखी कादंबरी आळेकरांचे 'महापूर' एलकुंचवारांची नाटके व एकांकिका इत्यादी वाङ्मयकृतीत मानवी मनाचा शोध घेण्याचा प्रयत्न केला आहे.

अंतर्मनाबरोबर मानवाच्या भोवतालचे भौतिक पर्यावरणही चित्रित करावे लागते आर्थिक सामाजिक, राजकीय पार्श्वभूमीच्या संदर्भात कथानक व पात्रांना उभे करावे लागते. सांस्कृतिक पार्श्वभूमी चित्रित करण्यासाठी धार्मिक मतप्रवाह, राजकीय विचार प्रणाली, जीवन विषयच्या विविध तत्वज्ञानांचे व्यूह आत्मसात करून व्यक्तिच्या उन्नती व कृतीव्दारे व लेखकाने सूचीत केलेल्या भाष्यातून उभी करावी लागते. यासाठी लेखकाला अर्थशास्त्र, समाजशास्त्र, राजकारण, तत्वज्ञान व इतिहास यांचा व्यासंग ठेवावा लागतो. मुक्तिबोध, कर्ढेकर, सूर्वे, अरूण साधू, जी.ए. कुलकर्णी यांच्या साहित्यात अशी समग्रता दिसते.

आशयाचे आणखी एक वैशिष्टय म्हणजे आधुनिक जाणीव (मॉडर्न कॉन्शसनेस) लेखकाच्या जाणीवेची मूस आधुनिक आहे की नाही. ज्या मन:कोषातून त्याचे साहित्य निर्माण होते त्याला आधुनिक संवेदनशिलतेचा स्पर्श आहे की नाही हे समकालीन साहित्याच्या दृष्टीने महत्वाचे आहे. म्हणून १९८५ सालीही गुलाबराव महाराजांसारखी रचना करणारे धार्मिक वाङ्मयाचा समकालीन साहित्यात समावेश होणार नाही. धार्मिकतेवर आधारलेल्या अंधश्रध्दाळू तसेच धार्मिक दृष्टया मने चिथावणारे वाङ्मय समकालीन होऊ शकत नाही. धर्म ही आज कालबाहय झालेली गोष्ट आहे. धर्माचा गाभा असलेली सामाजिक नीती व माणूसकी यांना नव्या मानवी मूल्यांची जोड देवून आजचा ज्ञानविज्ञान संस्कारित माणूस या पृथ्वीवरचा एक नागरिक म्हणून केवळ माणूस म्हणून जगण्याचा प्रयत्न करतो. म्हणून धर्माची लेबले आपल्या कपाळावर तो लावीत नाही.

संकूचीत जात जमातवादी आणि प्रादेशिक वाङ्मय हे समकालीन होऊ शकत नाही. दळणवळणाच्या साधनांनी आज जग इतके लहान झाले आहे की, गाव, जिल्हा, प्रांत यांच्याच कक्षात घोटाळणारे व त्यांना अभिमानाचे विषय बनविणारे साहित्य समकालीन साहित्य ठरणार नाही. राष्ट्रवाद ही आजही एक प्रभावी प्रेरणा आहे. तरीही राष्ट्राच्या सीमा ओलांडून आंतरराष्ट्रीय घटना व प्रवाहाचा वेध घेणारे साहित्य समकालीन साहित्य ठरू शकेल. सरंजामशाही, हुकूमशाही, गुलामगिरीचे समर्थन करणारे साहित्य आणि जात, जमात, संप्रदाय यात फिरणारे साहित्य समकालीन ठरणार नाही.

तात्पर्य इहलोकवादी, विज्ञानवादी, धर्मनिरपेक्षतावादी, लोकशाहीवादी आणि वाङ्मयीन आंतरराष्ट्रीयत्ववादी साहित्य हे समकालीन साहित्य होय. कारण ही समकालीन साहित्याची आधुनिक प्रवृत्ती आहे.
आधुनिकतेचा अंगिकार ही समकालीन साहित्याची आवश्यक अट आहे. या दृष्टीने मराठीतील प्रमुख प्रवाहांपैकी अस्तित्वादी प्रवाह, नवसाहित्याचा प्रवाह, मार्क्सवादी प्रवाह, दलीत साहित्याचा प्रवाह हे बहुतेक पूर्णांशाने समकालीन साहित्यात येतील. पण ग्रामीण व जनसाहित्य प्रवाहातील वरील आधुनिकतेची वृत्ती प्रकट करणारेच साहित्य समकालीन साहित्यात येईल बाकीचे येणार नाही.

शेवटचा आणि सर्वात महत्वाचा असा समकालीन साहित्याचा निकष आहे. मूल्यांचा अथवा जाणीवेचा आतापर्यंत पाहिलेल्या सर्व मुद्यांच्या बुडाशी असलेला हा मुद्दा आहे. किंबहुना असे म्हणता येईल की, 'समकालीन मूल्यांचा अथवा जाणीवांचा अविष्कार ज्यात होतो ते समकालीन साहित्य' तर ते वावगे ठरणार नाही.

जाणीवेच्या आणि मूल्यांच्या पातळीवर उभ्या मराठी वाङ्मयास आपल्याला सरळ दोन तट दिसतात. हे वर्गिकरण जरा स्थूल असले तरी ते मूलभूत आहे. प्रतिगामी—पुरोगामी, परिवर्तन नाकारणारे—परिवर्तननिष्ठ, सामाजिक बांधिलकी नाकारणारे— सुधारणावादी, भूतकालसन्मुख—भविष्य सन्मुख इत्यादी. यातील प्रतिगामी परंपरावादी व भूतकाळाचे पुनरूज्जीवन करू म्हणणारी धारा ही समकालीन साहित्याची धारा ठरू शकत नाही. कारण तिची जाणीव सरंजामी जाणीव असते आणि भारतात सरंजामशाही केव्हाच इतिहासजमा झाली आहे. साध्या सरळ शब्दात सांगायचे तर असे म्हणता येईल की, समकालीन साहित्य ठरवण्यासाठी त्या साहित्यातून किमान भांडवली जाणीव ही तरी व्यक्त झाली पाहिजे. भांडवली जाणीव ही निदान आधुनिक जाणीव तरी आहे. मात्र या आधीच्या सर्व सामाजिक व्यवस्थांचा पुरस्कार करणाऱ्या जाणीवा उदा. सरंजामी, गुलामी, आदिम हया जाणीवा आधुनिक नसल्याने ते साहित्य समकालीन ठरणार नाही. समाजवादी विचार व्यक्त करणारी जाणीव नि:संशयपणे समकालीन ठरेल. कारण जगात अनेक देशात समाजवादाची स्थापना झाली असल्याने आज समाजवाद एक वास्तव बनले आहे. खुद भारतातही

समाजवादी व्यवस्थेला अनुकूल असे अनेक घटक असल्याने येथेही ते वास्तव आहे. किंबहुना मूल्यदृष्टया ही सर्वात प्रगत आणि श्रेष्ठ जाणीव ठरेल. उदा. मुक्तीबोध, सुर्वे, ढसाळ, प्रकाश जाधव यशवंत मनोहर यांच्या काव्यात. अरूण साधू, अनिल बर्वे, शांताराम गरूड यांच्या कादंबऱ्यात आणि जेव्हा माणूस जागा होतो, एका रागारागिणीची हकीकत, कोठे आणि कधीतरी, या आत्मररित्रात ही जाणीव आढळते. मात्र साम्यवादी समाजाचे चित्र हे सुंदर व उदात्त ठरले तरी ते वास्तव ठरणार नाही. कारण जागतिक पातळीवर अजून तरी साम्यवादी समाजाची (म्हणजे वर्गरहित, राज्यरहित, पूर्ण विकसित नव्या माणसाचा अंतर्भाव असलेल्या व अतिप्रचंड उत्पादन येत असल्याने जगण्यासाठी फारच थोडे श्रम करून उरला वेळ सांस्कृतिक, वैचारिक अभिक्रियांमधे व्यतीत करणारा असा समाज) स्थापना झालेली नसल्याने त्याचे साहित्यात चित्रण करणारे साहित्य समकालीन ठरणार नाही.

जाणीवेच्या दृष्टीने आस्तित्ववादी प्रवाह, मार्क्सवादी प्रवाह, दलीत साहित्य प्रवाह, आणि जनसाहित्य प्रवाह कालीन साहित्यात सामील केल्या जाऊ शकतात. पण या पातळीवरही दोन धारा दिसतात. मुक्तिबोधांनी वर्णन केल्याप्रमाणे १) निराश मानवातावादी व २) आशावादी मानवतावादी अ) व्यक्तिकेन्द्रीत व ब) समाज केंन्द्रीत असे दोन तट त्यात आहेत. त्यातील श्रेष्ठ विभाग कोणता हे ठरविण्यासाठी मूल्यांचा आधार घ्यावा लागतो. दोन्ही प्रवाहातील लेखक समर्थ साहित्यिक आहेत. पण मूल्यदृष्टया पाहिले तर आशावादी मानवतावादाची धारा श्रेष्ठ आहे. पहिल्या प्रवाहातील मर्ढेकर, जी.ए. कुलकर्णी, चित्रे, तेंडूलकर, एलकुंचवार, खानोलकर, भालचंद्र नेमाडे, भाऊ पाध्ये, आळेकर हयांचा समावेश होतो तर दुसऱ्या प्रवाहातील शरदचंद्र मुक्तिबोध, सुर्वे, ढसाळ, प्राकश जाधव, यशवंत मनोहर, अरूण साधू, अनिल बर्वे इत्यादी लेखक समकालीन मराठी साहित्यातील बीनीचे लेखक मूल्यदृष्टया दुसराप्रवाह हा श्रेष्ठ वाटतो. कारण काय?

कारण असे की, दुसऱ्या प्रवाहाला एका महान जीवनमूल्यांची बैठक आहे. ती म्हणजे मानवतावादी आहेत. उदा. मर्ढेकर पण निराशावादी मानवतावादाला प्रत्यक्ष काय अर्थ उरतो? माणसांना पृथ्वीवर जगायचे आहे. विकास करायचा आहे. सुखशांतीची स्वप्ने घेऊन भविष्याकडे जायचे आहे. मृत्यू, दुःख विनाश पचवून उमलायचे आहे, फुलायचे आहे. माणसाची जीवनेच्छाच अशी प्रबळ आहे. म्हणून आशावादी मानवतावाद हे माणसाच्या जगण्याच्या मूलभूत प्रवृत्तीशी निगडीत असे मूल्य असून जीवन प्रवासाची दिशा ठरविणोर महान ध्येय आहे.म्हणून मूल्यदृष्टया निराशावादी मानवतावादापेक्षा आशावादी मानवतावादाचा प्रवाह मूल्यदृष्या श्रेष्ठ आहे.

समकालीन साहित्य नेमके कशाला म्हणायचे याची निश्चिती या प्रमाणे होऊ शकते. समकालीनाची ही संकल्पना कालदृष्टया व मूल्यदृष्टया अशा दोनही अंगाने निश्चित होणारी आहे. समकालीन साहित्याचा कालखंड हा ढोबळपणे १९४०—५० पासून मानला जात असून या कालखंडात घडलेल्या दोन महत्वपूर्ण घटनांचा प्रभाव जागतीक साहित्यावर तसेच मराठी साहित्यावर घडून आलेला दिसतो. या घटनाच येवढया प्रभावी आहेत की त्याचा परिणाम व प्रभाव समग्र मानवी जीवनावर तसेच संस्कृतीवर पडला आहे. व्दितीय महायुध्द आणि भारताचे स्वातंत्र्य या दोनही घटनामुळे भारतीय जनजीवन तळापासून ढवळून निघाले. भारताच्या प्राचीन संस्कृतीवर सुध्दा त्याचा परिणाम घडून सांस्कृतिक जीवनात त्यामुळे फार मोठे बदल घडून आले. या घटनांच्या पुर्वी मराठी साहित्याला प्राप्त झालेला साचेबध्दपणा नंतरच्या कलाखंडात नष्ट झाला.

महायुध्दानंतर जागतीक साहित्यामधे नवनवीन प्रवृत्तीप्रवाह निर्माण झाले. मराठी साहित्यातही त्यांचा शिरकाव तर झालाच त्या बरोबरच भारतीय स्वतंत्र्यामुळे भारतीय समाज जीवनात बरीच उलथापालथ होऊन या परिवर्तनाचे लाटेत बरीच सांस्कृतीक उलथापालथ देखील घडली. भारताची फाळणी, दलितांचे धर्मांतर, निद्रिस्त ग्रामीण समाजातील जागृती, समान नागरिकत्व, शिक्षणाचा सार्वत्रिक प्रसार इत्यादी घटनांमुळे साहित्याच्या प्रांतात नवनवीन लोक प्रविष्ट झालेत व साहित्याच्या कक्षा रूंदावण्यास त्यामुळे मोलाची मदत झाली. सांस्कृतिक दृष्या ग्रामीण, नागर, दलीत, सवर्ण, गरीब श्रीमत स्त्री, पुरूष आदी सर्व स्पृस्यास्पृश्य, जाती एक साहित्याकडे वळलेत. सर्व स्तरावातील, जाती जमातीतील, वर्गातील जनसामान्यांच्या भावभावना व इच्छा आकांक्षांचे प्रतिबिंब साहित्यामधे उमगले. समकालीन साहित्याच्या पूर्वी साहित्यात येवढया मोठया प्रमाणात असे परिवर्तन घडलेले नव्हते, अशा प्रकारे समकालीन साहित्याचे सांस्कृतिक संदर्भ व्यापक स्वरूपात प्रतिपादन करता येतील.

**संदर्भ ग्रंथ :—**

१) समकालीन साहित्य प्रवृत्ती व प्रेरणा द.भि. कुलकर्णी अभिनंदन ग्रंथ
२) मराठी साहित्य प्रेरणा व स्वरूप १९५०—७५ संपादक : गो.मा. पवार, म.द. हातकणंगलेकर
३) भालचंद्र नेमाडे : कादंबरी : मराठी साहित्य प्रेरणा व स्वरूप